**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात....**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/७०/२०२४

दिनांक - ३१.०१.२०२५

**प्रति,**

१. सुशिला पुंडलिक कदम

रा.बेळुंखी ता.जत जि.सांगली ....... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. भगवान यशवंत चव्हाण

२. आण्णासो नामदेव जाधव

अ.क्र.१ रा. बेळुंखी, ता.जत, जि.सांगली

अ.क्र.२ रा.कुंभारी, ता.जत, जि.सांगली ...... **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र.**

**वाद मिळकतीचा तपशिल.**

| गांव | तालुका | गट नंबर | एकूण क्षेत्र | पैकी वादाचे क्षेत्र | वादाचा फेरफार |
|---|---|---|---|---|---|
| बेळुंखी | जत | १९२ | ०० हे.४५ आर., पो.ख.०० हे. ०० आर. | ०० हे.३० आर., पो.ख.०० हे.०० आर. | ३६६६ |
| | | २०९ | ०० हे.३० आर., पो.ख.०० हे. ०० आर. | ०० हे.१५ आर., पो.ख.०० हे.०० आर. | |

मौजे बेळुंखी, ता.जत येथील उक्त वाद मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, डफळापूर यांनी फेरफार नंबर ३६६६, प्रकरणी तक्रार-रजि.क्र.२५/२०२३, दिनांक ०४.०१.२०२४, अन्वये दिलेल्या आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपिल प्रकरणी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी युक्तीवादामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. वाद मिळकती या अपिलार्थी यांचे वडील श्री.बाबासाहेब गोविंद चव्हाण यांच्या वडीलोपार्जीत शेत जमीनी आहेत अपिलार्थी यांचे वडील बाबासाहेब यांना मुलगा संतान नसलेने त्यांचा मिळकती जाबदार नं. २ यांनी बेकायदेशीर पणे खरेदी केलेली म्हणुन अपिलार्थी यांनी जत येथील दिवाणी न्यायालयात रे.दि.मु.नं.१६१/२०२० चा दावा दाखल केला व त्या दावेचे कामी जाबदार नं. २ यांनी खरेदी केलेला मिळकती अपिलार्थी यांचे वर बंधन कारक नाही. असे मागीतले नंतर चाणाक्ष जाबदार नं. २ यांनी जाबदार नं. १ यांना बेकायदेशीर पणे विक्री केलेली आहे.

२. वाद मिळकती या अपिलार्थी यांचा वडीलोपार्जीत आहेत त्यांचा फेरफार नं.९३२ ने ७/१२ अभिलेख सदरी त्याचा नोद आहे. सदर जमीनी व्यतिरीक्त श्री. बाबासाहेब चव्हाण यांच्या अन्य ग.नं. १६७ ही जमीन ग.नं.२११ ही समाईक वडीलोपार्जीत मिळकती आहेत. श्री. बाबासाहेब चव्हाण यांना अपिलार्थी शिवाय उषाताई ही मुलगी असुन यातील जाबदार नं.२ हा सदर उषाताईचा पती आहे.सदर जमीनी मध्ये अपिलार्थी, उषाताई व श्री. बाबासाहेब यांचे दरम्यान अद्याप कोणतेही प्रकारचे सरस निरस मानाने वाटप झालेले नव्हते व नाही. सदर मिळकती मध्ये अपिलार्थी यांचा हिंदु कायदा, हिंदु वारसा कायद्या अन्वये अविभक्त हक्क, हिस्सा अधिकार आहे.

**जाबदार यांनी त्यांचे लेखी युक्तीवादामधील सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. अपिलार्थी यांच्या अपीलातील मिळकतीचे वर्णन वगळता संपूर्ण मजकूर खोटा, बनावट व लबाडीचा असलेने तो या जाबदार यांना मूळीच मान्य व कबूल नाही. अपिलार्थी यांनी या मे. कोर्टाचा बहुमूल्य वेळ वाया घालवावा व या जाबदार यांना मानसिक त्रास देण्याच्या गैरउद्देशाने प्रस्तुत अपील दाखल केले असून त्यात खोटा व बनावट व चुकीचा मजकूर नमूद करुन जे अपील दाखल केले आहे ते चालणेस पात्र नाही. सबब ते रद्द करण्यात यावे.

२. वाद मिळकती या मूळच्या बाळासो गौंविंद चव्हाण व सोनाबाई लक्ष्मण कदम यांच्या होत्या. त्या मिळकती या जाबदार नं.२ यांनी नोंदणीकृत खरेदी दस्ताने घेतलेली आहे व त्याप्रमाणे जाबदार नं.२ चे नावाची नोंद फे.नं. १४४३ ने सदर मिळक्तीचे ७/१२ रेकॉर्ड सदरी झालेले होती व आहे ती फेरफाराची नोंद अथवा सदरचा झालेला दस्त आज तागायत कोणत्याही सक्षम मे दिवाणी न्यायालयाने रद्दबातल ठरवला नव्हता अथवा नाही. अथवा त्या दस्ता वरुन झालेला फेरफाराची नोंद ही कोणत्याही मे. महसूली कोर्टाने रद्दबातल ठरवली नाही. असे असून जाबदार नं.२ यानी जाबदार नं.१ यांना नोदणीकृत खरेदी दस्त क्र. ४५१०/२०२३ रोजीचे दिनांक २५/९/२०२३ रोजीचे नोंदणीकत खरेदी दस्ताने दिलेली आहे व त्याही मिळकतीचे झाले दस्ताबाबत कोणत्याही मे. दिवाणी न्यायालयाचा स्थगिती आदेश नव्हता व नाही व तो दस्त चुकीचा व बेकायदेशीर असे कोणत्याही मे. कोर्टाने ठरवलेले नव्हते व नाही. तो दस्त व त्या दस्तावरुन झालेला फे. नं. ३६६६ ची नोंद ही कोणत्याही मे. दिवाणी अथवा मे. महसूली कोर्टाने रद्दबातल ठरवली नाही.

३. जाबदार नं.२ यांनी वाद मिळकती त्याचे स्वकष्टार्जीत मालकी व वहीवाटीच्या असलेने त्या मिळकती जाबदार नं.१ यांना योग्य मोबदला घेऊनच विक्रि केली आहे. व त्या मिळकती मध्ये जाबदार नं.१ ची कब्जते वहीवाट व मालकी आहे. सदर मिळकती या कधीही वडीलार्जीत नव्हत्या व नाहीत. व त्या मिळकती बाबत अपिलार्थी यांना तक्रार करणेचा हक्क व अधिकारच राहीलेला नाही. केवळ या जाबदार नं.१ यांना त्रास द्यावा व त्यांना आर्थीक खर्चात टाकून मानसिक त्रास द्यावा व त्यांचे कडून पैसे लाटावे या गैरउद्द्शाने प्रस्तुत अपील अपिलार्थी दाखल केले आहे ते चालणेस पात्र नाही. सबब ते खर्चासह रद्द करणेत यावे.

**अपिलार्थी यांनी प्रकरणी दाखल केलेला अपील मेमो, जाबदार यांचा लेखी युक्तीवाद प्रकरणी दाखल कागदपत्रे यांचे एकत्रित अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे बेळुंखी, ता.जत येथील उक्त वाद मिळकतीसंदर्भात मंडळ अधिकारी, डफळापूर यांनी फेरफार नंबर ३६६६, प्रकरणी तक्रार-रजि.क्र.२५/२०२३, दिनांक ०४.०१.२०२४, अन्वये दिलेल्या आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

२. वादातीत फेरफार क्र.३६६६ चे अवलोकन केले असता जाबदार क्र.२ यांनी जाबदार क्र.१ यांना खरेदी दस्त क्र.४५१०/२०२३ दिनांक २६.०९.२०२३ ने भूमापन क्र.१९२ व २०९ मधील जाबदार क्र.२ यांचे संपूर्ण हिस्सेचे क्षेत्र हस्तांतरीत केलेले आहे. वास्तविक वाद मिळकत यापूर्वी जाबदार क्र. २ यांनी बाळासो गोविंद चव्हाण व सोनाबाई लक्ष्मण कदम यांचेकडून खरेदी केलेचे फेरफार क्र.१४४३ अन्वये दिसून येते. उक्त फेरफार आजअखेर कोणत्याही सक्षम न्यायालयाने रद्द केलेला नाही.

३. वास्तविक जाबदार क्र.२ यांनी नोंदणीकृत खरेदी दस्ताने हस्तांतरीत केलेल्या वाद मिळकतीच्या क्षेत्राची नोंद नामंजूर करणेस कोणतेही सबळ कारण दिसून येत नाही. तसेच भारतीय नोंदणी कायदा १९०८ मधील ५२ नुसार नोंदणीकृत दस्ताची नोंद विहीत प्रक्रियेअंती अधिकार अभिलेख सदरी घेणे ऐवढेच मर्यादीत अधिकार क्षेत्र मंडळ अधिकारी, डफळापूर यांना होते, प्रमाणे त्यांनी निर्णय पारीत केलेला आहे. त्याअनुषंगाने मंडळ अधिकारी, डफळापूर यांची तक्रार रजि नं.२५/२०२३ दिनांक ०४.०१.२०२४ च्या आदेशाअन्वये फेरफार नंबर ३६६६ ची नोंद मंजूर करणेची कृती योग्य व कायदेशीर आहे. यास्तव मी,अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर आदेशाची अंमलबजावणी अपील कालावधी नंतर करणेत यावी.

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

( अजयकुमार नष्टे )
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण - जत
दिनांक -३१.०१.२०२५

(शिक्का: उप विभागीय अधिकारी, जत उपविभाग, जत — सत्यमेव जयते)

प्रत- तहसिलदार जत यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.